cmyk

SHIV VANI

# शिव वाणी

सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी

का.संपादक : वेदांत वैभव स्वामी
संपादक : वैभव विवेक स्वामी

vaibhav11swami@gmail.com
beedshivvani@gmail.com
Mo.9422748792/ 9822628521
SB / BEED / RNP / 279 / 2026 - 2028

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड ☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड ☎: 0220377, मो. 9405072777

बीड | साप्ताहिक | मराठी | वर्ष २४ वे | अंक-३७ | सोमवार, दि.१४ सप्टेंबर २०२६ | RNI-MAHMAR2003/14666 | किंमत: ३ रू. | पाने : ४
Beed (Maharashtra) | Weekly | MARATHI | Year-24 | Issue -37 | Monday, Dt. 14 September-2026 | RNI-MAHMAR2003/14666 | Rupees - 3 Rs | PAGES - 4

# मुंबईकडे निघणार मराठ्यांचा लोंढा, सरकारने संवादाचा दरवाजा उघडावा!

## आरक्षणाच्या ज्वलंत प्रश्नावर संघर्ष नव्हे, संवेदनशील आणि कायदेशीर तोडगा हवा

## आंदोलनाची ताकद आणि महाराष्ट्राची शांतता जपण्याची सरकारपुढे कसोटी

**बीड | वेदांत स्वामी**

**महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक इतिहासात काही आंदोलने केवळ रस्त्यावर उतरणाऱ्या गर्दीने मोठी होत नाहीत. ती समाजाच्या मनात साचलेल्या वेदना, अपेक्षा आणि असंतोषाचे प्रतिबिंब बनतात. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली उभे राहिलेले आंदोलन आज अशाच एका निर्णायक वळणावर येऊन पोहोचले आहे.**

ताज्या घडामोडींनुसार, मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईकडे मोर्चा काढून आझाद मैदानावर बेमुदत आंदोलन करण्याची घोषणा केली आहे. मुंबईकडे जाणारा हा मोर्चा १५ सप्टेंबरपासून सुरू होऊन पुढील टप्प्यांत राजधानीत पोहोचण्याची भूमिका जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे राज्य सरकार, प्रशासन आणि सर्वसामान्य महाराष्ट्रासमोर आता केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न नाही, तर संवाद, संयम आणि सामाजिक सलोख्याची मोठी परीक्षा उभी ठाकली आहे. मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न हा आजचा नाही. अनेक वर्षांपासून तो न्यायालयीन, घटनात्मक, सामाजिक आणि राजकीय पातळीवर गुंतागुंतीचा बनला आहे. म्हणूनच या प्रश्नाकडे केवळ आंदोलन मोडून काढण्याच्या किंवा आंदोलकांना शांत करण्याच्या दृष्टिकोनातून पाहून चालणार नाही. एका समाजाची वेदना समजून घेताना दुसऱ्या समाजाच्या अधिकारांवर अन्याय होणार नाही, याचीही तितकीच काळजी घ्यावी लागेल. हाच खऱ्या अर्थाने राज्यकर्त्यांचा धर्म आहे. लाखोंची गर्दी नव्हे, लाखो मनातील अपेक्षांचा प्रश्न.! मनोज जरांगे पाटील यांच्या आवाहनाला मोठा प्रतिसाद मिळत असल्याने मुंबईकडे मोठ्या संख्येने आंदोलक येण्याची शक्यता आहे. यामुळे वाहतूक, सार्वजनिक व्यवस्था आणि कायदा-सुव्यवस्थेवर मोठा ताण येऊ शकतो. विशेषतः उत्सवाच्या आणि गर्दीच्या दिवसांत मुंबईसारख्या महानगरात अशी परिस्थिती निर्माण होणे ही प्रशासनासाठी मोठी कसोटी असेल. मात्र, या संभाव्य गर्दीकडे केवळ 'कायदा-सुव्यवस्थेचा धोका' म्हणून पाहणेही योग्य ठरणार नाही. कारण आंदोलनामागे असलेल्या भावना समजून घेणे आवश्यक आहे. हजारो तरुणांच्या शिक्षणाचा, नोकरीचा आणि भवितव्याचा प्रश्न या आंदोलनाशी जोडला गेला आहे. त्यामुळे सरकारने या जनभावनेचा आदर केला पाहिजे. त्याचवेळी आंदोलकांनीही हे लक्षात घेतले पाहिजे की, महाराष्ट्र हा सर्वांचा आहे आणि मुंबईही सर्वांची आहे. आंदोलनाचा अधिकार लोकशाहीने दिला आहे परंतु सामान्य नागरिकांचे जगणे विस्कळीत करण्याचा अधिकार कोणालाही नाही. सरकारने 'वेळ काढण्याचे' राजकारण थांबवावे आज सर्वांत मोठी गरज आहे ती विश्वासार्ह संवादाची. शिष्टमंडळे पाठवणे, आश्वासने देणे आणि समित्यांच्या घोषणा




करणे यापलीकडे सरकारने ठोस भूमिका मांडण्याची वेळ आली आहे. सरकारने तातडीने मनोज जरांगे पाटील आणि आंदोलनाच्या प्रतिनिधींशी थेट व उच्चस्तरीय चर्चा करावी, मराठा आरक्षणा संदर्भातील प्रत्येक मागणीची घटनात्मक आणि कायदेशीर स्थिती जनतेसमोर स्पष्ट करावी, पात्र व्यक्तींना कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणि गती आणावी, प्रलंबित प्रश्नांबाबत निश्चित कालमर्यादेसह कृती आराखडा जाहीर करावा आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे जनतेला केवळ आश्वासन नव्हे, तर विश्वास देईल असा निर्णय घ्यावा. मराठा आरक्षणाच्या मागणीशी संबंधित विविध प्रश्नांमध्ये कुणबी प्रमाणपत्रे, ऐतिहासिक नोंदी आणि इतर मागण्यांचा समावेश असून, या विषयावर घटनात्मक व कायदेशीर चौकटीत तोडगा काढण्याची जबाबदारी सरकारवर आहे. आंदोलनही महाराष्ट्राच्या संस्कृतीला साजेसे असावे मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलन शांततापूर्ण राहील, अशी भूमिका विविध प्रसंगी मांडली आहे. हीच भूमिका लाखो समर्थकांनीही जपणे अत्यंत आवश्यक आहे. मराठा समाजाचा इतिहास संघर्षाचा आहे पण त्याचबरोबर तो संयम, शौर्य आणि सामाजिक जबाबदारीचाही इतिहास आहे. त्यामुळे आंदोलनाची ताकद रस्ते रोखण्यात नसून आपल्या मागणीच्या नैतिक सामर्थ्यात असली पाहिजे. दगडफेक, तोडफोड, हिंसाचार, द्वेषपूर्ण भाषा किंवा समाजा-समाजात तेढ निर्माण करणारी कृती झाली, तर त्याचा सर्वांत मोठा फटका आंदोलनालाच बसेल. आरक्षणाचा लढा न्यायाचा असला पाहिजे, ◀◀ पान २ वर

## बालकांच्या चेहऱ्यावर फुलणार हसू; दुभंगलेले ओठ-टाळूवरील उपचार आता मोफत

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून महत्त्वाचा उपक्रम

**मुंबई प्रतिनिधी**

**प्रत्येक बालकाच्या चेहऱ्यावर हसू फुलावे आणि त्याचे जीवन आनंददायी व्हावे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून दुभंगलेले ओठ व टाळू या जन्मजात विकाराने ग्रस्त बालकांना आता दर्जेदार व सर्वसमावेशक उपचार मोफत उपलब्ध होणार आहेत.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र, बजाज फायनान्स आणि 'स्माईल ट्रेन इंडिया' यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. हा करार तीन वर्षांसाठी लागू राहणार आहे. जन्मजात दुभंगलेले ओठ व टाळू यामुळे निरागस बालकांच्या चेह-यावरील हसू मावळून जाते. आपल्या मुलाच्या चेह-यावर एकदा तरी तरी हसू बघावे



यासाठी बालकांच्या आई-वडिलांची होणारी तगमग आणि त्यासाठी त्यांचे रुग्णालयाचे उंबरठे झिजवणे डोळ्यात पाणी आणते . शिवाय त्याचा उपचार खर्च मोठा असल्याने तो प्रत्येकच पालकाला परवडणारा नाही. याची जाणिव असणा-या मुख्यमंत्र्यांनी दूरदृष्टीने विचार करून अशा पालकांना मोठा दिलासा दिला आहे. आता राज्यातील एकही बालक दुभंगलेले ◀◀ पान २ वर

## मराठवाड्यात 3 लाख १६ हजारांहून अधिक कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप

### जात पडताळणीची १६ हजारांहून अधिक प्रकरणे निकाली; ५७ लाख जुन्या नोंदी संकेतस्थळावर उपलब्ध

**छ. संभाजीनगर | प्रतिनिधी**

मराठवाड्यात कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रमाणपत्रांच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी शासनाकडून सातत्याने कार्यवाही करण्यात येत असून, आतापर्यंत प्राप्त झालेल्या ३ लाख १७ हजार ५६९ अर्जांपैकी ३ लाख १६ हजार ९७७ नागरिकांना कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले आहे. तसेच जात पडताळणीसाठी प्राप्त २१ हजार ५१ अर्जांपैकी १६ हजार ११० प्रकरणांमध्ये जात पडताळणी



प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. शासनाची कार्यवाही पारदर्शक असून, मराठा समाजाला कायदेशीर व टिकणारे आरक्षण देण्याची शासनाची सकारात्मक भूमिका असल्याची माहिती मराठी भाषा व उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत यांनी आज स्मार्ट सिटी कार्यालयात पत्रकारांशी संवाद साधताना दिली. यावेळी आमदार प्रसाद लाड उपस्थित होते.

शिंदे समिती स्थापन झाल्यानंतर मराठवाड्यात करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती देताना मंत्री डॉ. सामंत ◀◀ पान २ वर

## कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचा 'उत्कृष्ट प्रशासकीय अधिकारी' सन्मानाने गौरव

### दैनिक समर्थ राजयोगच्या वर्धापन दिनानिमित्त स्मृतिचिन्ह प्रदान



**बीड प्रतिनिधी**

**बीडचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पदभार स्वीकारल्यापासून जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवत विकासकामांना गती देऊन बीड जिल्ह्याला प्रगतीच्या दिशेने पुढे नेण्याचे उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या उत्कृष्ट प्रशासकीय कार्याची दखल घेत दैनिक समर्थ राजयोगच्या वतीने वर्धापन दिनाचे औचित्य साधून 'उत्कृष्ट प्रशासकीय अधिकारी' या सन्मानाने त्यांना गौरविण्यात आले.**

यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना स्मृतिचिन्ह प्रदान करून दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी कार्यकारी संपादिका शेख आयेशा यांची उपस्थिती होती. जिल्ह्याच्या विकासासोबतच प्रभावी प्रशासन, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी केलेल्या कार्याबद्दल जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या कार्याचे यावेळी विशेष कौतुक करण्यात आले.

## फडणवीस, जॅकी श्रॉफ यांच्यासह मान्यवरांची मारबत महोत्सवाला हजेरी

**नागपूर | प्रतिनिधी**

**नागपूर शहराची अतिशय जुनी, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परंपरा असलेल्या मारबत महोत्सवाला यावर्षी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह प्रसिद्ध अभिनेते जॅकी श्रॉफ, ज्येष्ठ दिग्दर्शक सुभाष घई, अभिनेते अंकूश चौधरी, क्रिकेटर उमेश यादव यांनी उपस्थित राहून उपस्थित विशाल जनसमुदायाचा उत्साह वाढविला. काही देशांतील वाणिज्य राजदूतांनीही या महोत्सवाला हजेरी लावली लावून नागपूर शहराची ही खास परंपरा प्रत्यक्ष जाणून घेतली.**

नागपूरची ही परंपरा विशेष असून मारबत महोत्सवाला १४५ वर्षांचा वैभवशाली इतिहास आहे. शहराचे वैशिष्ट्य असलेल्या मारबत-बडग्या मिरवणुकीच्या परंपरेला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवून देण्यासाठी नागपूर महानगर पालिकेने पुढाकार घेऊन यावर्षी प्रथम मारबत महोत्सवाचे आयोजन केले. मारबत आणि विविध विषयांवरील बडग्यांची मिरवणूक मान्यवरांना पाहता यावी, यासाठी सेंट्रल अॅव्हेन्यूवरील गांधी पुतळा चौकात भव्य मंच उभारण्यात आला होता. याप्रसंगी नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अर्थ व नियोजन राज्यमंत्री ◀◀ पान २ वर

## 'डीसीएस एमएच' मोबाईल पवरून शेतकऱ्यांनी स्वतःच करा पीक नोंदणी-जिल्हाधिकारी

### नुकसान भरपाई, पीक विमा व शासकीय योजनांसाठी अचूक पीक नोंदणी महत्त्वाची



**बीड प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्यात केंद्र शासनाच्या 'डीसीएस एमएच' मोबाईल पद्वारे सहाय्यक स्तरावरील पीक नोंदणीचे काम दि. ११ ऑगस्ट २०२६ पासून सुरू करण्यात आले आहे. ही प्रक्रिया अधिक जलद, सुलभ आणि पारदर्शक करण्याच्या उद्देशाने आता शेतकऱ्यांना स्वतःच्या मोबाईलवरून आपल्या शेतातील पिकांची नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.**

दि. ११ सप्टेंबर २०२६ पासून शेतकऱ्यांना दुसऱ्या कोणावरही अवलंबून न राहता स्वतःच्या मोबाईलवरून डीसीएस एमएच ◀◀ पान २ वर

#### पीक नोंदणी का आहे महत्त्वाची?

विविध शासकीय योजना, नैसर्गिक आपत्तीमुळे होणारी नुकसान भरपाई, पीक विमा, शासकीय अनुदान तसेच इतर कृषीविषयक सेवांचा सुलभ व अचूक लाभ मिळविण्यासाठी शेतातील पिकांची वेळेत आणि योग्य नोंद करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांनी तातडीने डीसीएस एमएच मोबाईल प डाउनलोड करून आपल्या शेतातील पिकांची अचूक नोंदणी करावी आणि विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक माहिती अद्ययावत ठेवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.

#### शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे आवाहन

पीक नोंदणीची प्रक्रिया आता थेट शेतकऱ्यांच्या हातात आली असून, मोबाईलच्या माध्यमातून स्वतःची माहिती व पिकांची नोंद करता येणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील प्रत्येक शेतकऱ्याने या सुविधेचा वापर करून वेळेत पीक नोंदणी पूर्ण करावी, असे जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## निविदा सुचना

### महाराष्ट्र शासन

### मृद व जलसंधारण विभाग, आयुक्त, मृद व जलसंधारण, छत्रपती संभाजीनगर अधिक्षक अभियंता, मृद व जलसंधारण विभाग, छत्रपती संभाजीनगर कार्यकारी अभियंता, मृद व जलसंधारण विभाग, बीड

**पत्ता- जायकवाडी कॉलनी, नगर रोड, बीड**
**ई-मेल पत्ता-** eemilsdivbeed@gmail.com **दूरध्वनी क्र- ०२४४२-२२२५२०**
**ई निविदा सुचना क्र.बी-१/०४ सन २०२६-२७ (फेरनिविदा तिसरी वेळ)**

कार्यकारी अभियंता, मृद व जलसंधारण विभाग, बीड हे जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत कामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे उचित वर्गवारीत नोंदणीकृत कंत्राटदार यांच्याकडुन खालील कामाकरिता बी-१ नमुन्यातील ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://www.mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, बीड यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा किंमत | मुदत महिने | निविदा फ्रीस | कंत्राटदाराचा प्रवर्ग | कार्यालयाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नागरेवाडी गेटेड सिनाब ७ ता.शिरुर | ५५.५७ लक्ष | ०६ महिने | रु. २३६०/- | वर्ग खत (-) व त्यावरील | कार्यकारी अभियंता, मृद व जलसंधारण विभाग, बीड |

ई निविदा उपलब्ध कालावधी:-दिनांक १५.०९.२०२६ ते २३.०९.२०२६ उपलब्ध आहे.
ई-निविदा उघडणे :-२४.०९.२०२६
खालील ठिकाणी ई निविदाबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.
१) संकेतस्थळ http://mahatenders.gov.in
(सदर निविदा सूचनामध्ये काही बदल होत असल्यास वरील संक्तस्थळावर कळविण्यात येईल.)
२) सविस्तर निविदा सूचना जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, बीड यांचे कार्यालयातील सूचना फलकावर उपलब्ध आहे.

**स्वाक्षरीत/-**
**(स.पं. लब्बा)**
**कार्यकारी अभियंता,**
**मृद व जलसंधारण विभाग, बीड**

**विमाका/छत्रपती संभाजीनगर/जाहि/१२९/२०२६**

cmyk

## अग्रलेख....

# आभाळाकडे डोळे आणि कोरड्या जमिनीत भविष्याचा प्रश्न.!

बीड – मराठवाड्याची धरती आज पुन्हा एकदा आभाळाकडे आशेने पाहत आहे. बीड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यात निर्माण झालेली परिस्थिती दिवसेंदिवस चिंताजनक बनत चालली आहे. पावसाने अपेक्षित साथ न दिल्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर उभे असलेले खरीप पीक जवळपास वाया जाण्याच्या मार्गावर आहे. कष्टाने पेरलेले बी, खतासाठी घेतलेले कर्ज, मशागतीवर झालेला खर्च आणि हिरव्यागार शिवाराची स्वप्ने आज कोरड्या जमिनीत करपताना दिसत आहे.

आता सर्वांच्या नजरा परतीच्या पावसाकडे लागल्या आहेत. परतीच्या पावसानेही मराठवाड्याकडे पाठ फिरवली, तर प्रश्न केवळ खरीप पिकाच्या नुकसानीपुरता मर्यादित राहणार नाही. रब्बी हंगाम, पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा, शेतीसाठी पाणी आणि ग्रामीण जनजीवनाचा प्रश्न एकाच वेळी गंभीर स्वरूप धारण करू शकतो. आजची परिस्थिती ही केवळ हवामानाची बातमी नाही ती मराठवाड्याच्या उद्याच्या अस्तित्वाची घंटा आहे.!

खरीप गेला आता रब्बीचे काय ?

शेतकऱ्यांसाठी खरीप हंगाम हा वर्षभराच्या आर्थिक गणिताचा महत्त्वाचा आधार असतो. खरीप पिकावरच अनेक कुटुंबांचे वर्षभराचे नियोजन अवलंबून असते. पिके हातातून गेली तर शेतकऱ्यांच्या हातात केवळ नुकसान उरते पण त्या नुकसानीची साखळी पुढे संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेला हादरा देते. खरीपानंतर रब्बीची आशा असते. मात्र जमिनीत पुरेशी ओल नसेल, तलाव–बंधारे कोरडे असतील आणि भूजलपातळी खालावत गेली, तर रब्बीची पेरणी करायची ती कशी ? एका हंगामाचे संकट दुसऱ्या हंगामाचे भविष्यही गिळंकृत करण्याच्या मार्गावर आहे. आज सरकारने हा धोका वेळेत ओळखला नाही, तर काही महिन्यांनंतर केवळ पिकांच्या नुकसानीची आकडेवारी मोजत बसण्याची वेळ येईल.

उद्या पाणी नसेल तर जगायचे कसे.?

दुष्काळाचे सर्वांत भयावह रूप म्हणजे तहान. शेतीचे नुकसान भरून काढण्यासाठी मदत मिळू शकते पण रिकाम्या विहिरीत पाणी निर्माण करता येत नाही.! आजपासूनच पिण्याच्या पाण्याचे नियोजन केले नाही, तर पुढील काही महिन्यांत गावोगावी पाण्यासाठी संघर्षाची परिस्थिती निर्माण होऊ शकते. टँकर, पाण्याच्या रांगा, महिलांच्या डोक्यावरील हंडे आणि पाण्यासाठी होणारी धावपळ मराठवाड्याने हे चित्र यापूर्वी अनेकदा पाहिले आहे. प्रश्न असा आहे की, पुन्हा तेच दिवस येण्याची वाट सरकार पाहणार आहे का ? आजच प्रत्येक गावातील जलस्रोतांचा आढावा घेतला पाहिजे. विहिरी, बोअरवेल, तलाव, बंधारे आणि उपलब्ध पाणीसाठ्याचे वास्तववादी नियोजन केले पाहिजे. ज्या गावांना पाणीटंचाईचा धोका आहे, त्यांची यादी तयार करून तातडीने उपाययोजना सुरू झाली पाहिजे. दुष्काळ जाहीर झाल्यानंतर उपाय करणे म्हणजे संकट आल्यानंतर दरवाजा बंद करण्यासारखे आहे; खरी गरज संकट येण्यापूर्वी तयारी करण्याची आहे.!

जनावरांचा प्रश्नही तितकाच गंभीर

मराठवाड्याची ग्रामीण अर्थव्यवस्था शेतीबरोबरच पशुधनावरही उभी आहे. पाऊस नाही, चारा नाही आणि पाणी नाही, तर जनावरांचे काय ? आज शेतकरी आपल्या पिकांबरोबरच आपल्या जनावरांकडेही हतबल नजरेने पाहत आहे. चारा छावण्या, चाऱ्याची उपलब्धता, पाणीपुरवठा आणि पशुधनाच्या आरोग्याचे नियोजन सरकारने आतापासूनच केले पाहिजे. शेतकऱ्याचे जनावर म्हणजे केवळ पशू नाही; ते त्याच्या संसाराचे, शेतीचे आणि अर्थकारणाचे आधारस्तंभ आहेत. त्यामुळे संभाव्य चारा टंचाईकडे दुर्लक्ष करणे ही भविष्यातील मोठी चूक ठरू शकते.

गणरायाच्या विसर्जनासाठीही पाण्याचा प्रश्न.!

यंदाच्या परिस्थितीतील सर्वांत वेदनादायक आणि संवेदनशील चित्र म्हणजे लाडक्या गणरायाचे विसर्जन करायचे तरी कुठे ? गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या श्रद्धेचा, संस्कृतीचा आणि भावनेचा उत्सव आहे. गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या म्हणत भक्त आपल्या बाप्पाला निरोप देतात. पण तलाव, नदी, ओढे आणि जलाशय कोरडे पडले तर विसर्जनाची व्यवस्थाच गंभीर प्रश्न बनू शकते. ही परिस्थिती आपल्याला एक कठोर संदेश देत आहे.

निसर्गाला विसरून उत्सव साजरा करता येत नाही.!

यंदा प्रशासनाने गावोगावी आणि शहरांमध्ये कृत्रिम विसर्जन कुंडांची व्यवस्था, पर्यावरणपूरक मूर्तींचा वापर आणि पाण्याची बचत याबाबत व्यापक नियोजन केले पाहिजे. श्रद्धेला धक्का न लावता निसर्गाचे रक्षण करणे हीच खरी गणरायाची सेवा ठरेल.

सरकारने घोषणा नव्हे, कृती आराखडा जाहीर करावा.!

आता केवळ बैठका, पाहणी दौरे आणि आश्वासनांनी काम भागणार नाही. मराठवाड्याच्या परिस्थितीकडे सरकारने आपत्कालीन दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे.

सरकारने तातडीने १) खरीप पिकांचे वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत शेतकऱ्यांच्या नुकसानीचे वास्तव लपवून चालणार नाही. गावनिहाय पाहणी करून नुकसानीचे योग्य मूल्यांकन झाले पाहिजे. २) दुष्काळी परिस्थितीचा वैज्ञानिक आढावा घ्यावा पाऊस, पिके, भूजल आणि पाणीसाठा या सर्व बाबींचा विचार करून वेळेत निर्णय घेतला पाहिजे. ३) पिण्याच्या पाण्याचे नियोजन आतापासूनच करावे टँकरची वेळ येण्यापूर्वी पर्यायी जलस्रोत आणि पाणीपुरवठ्याचे नियोजन आवश्यक आहे. ४) चाऱ्याचा साठा आणि छावण्यांची तयारी करावी जनावरांना पाणी आणि चारा मिळणार नाही, अशी वेळ येऊ देऊ नये. ५) रब्बी हंगामासाठी विशेष नियोजन करावे बियाणे, पाणी, पर्यायी पिके आणि शेतकऱ्यांना आवश्यक मदतीबाबत स्पष्ट धोरण जाहीर झाले पाहिजे. ६) शेतकऱ्यांना तातडीचा आर्थिक आधार द्यावा हातात पीक नाही, उत्पन्न नाही आणि कर्जाचे ओझे आहे. अशा वेळी शेतकऱ्याला कागदोपत्री नव्हे, तर प्रत्यक्ष मदतीची गरज आहे. जनतेनेही पाण्याच्या प्रत्येक थेंबाची किंमत ओळखावी सर्व जबाबदारी केवळ सरकारची आहे, असे म्हणून जनतेलाही हात झटकता येणार नाही. आज प्रत्येक घराने, प्रत्येक गावाने आणि प्रत्येक शहराने पाणी वाचविण्याची शपथ घेतली पाहिजे. वाहून जाणारे पाणी अडविणे, उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे, जलस्रोत प्रदूषित न करणे आणि सामूहिक पातळीवर जलसंवर्धन करणे–ही आज काळाची गरज आहे. पाण्याचा प्रश्न सरकारच्या दारात जाऊन संपत नाही तो प्रत्येक घराच्या नळापासून सुरू होतो.! आजची हाक ऐकली नाही, तर उद्याचा आक्रोश मोठा असेल.! मराठवाड्याच्या शेतकऱ्याने दुष्काळाची झळ अनेकदा सोसली आहे. प्रत्येक वेळी तो आभाळाकडे पाहतो, पाऊस पडेल या आशेने पुन्हा पेरणी करतो आणि संकटाशी दोन हात करतो. पण प्रत्येक वेळी त्याच्या सहनशीलतेची परीक्षा घेणे योग्य नाही. आज बीडसह संपूर्ण मराठवाड्याच्या शिवारातून एकच प्रश्न विचारला जात आहे. सरकार, आमची कोरडी जमीन तुम्हाला दिसतेय का ? आज प्रशासनाने डोळे उघडले, वेळेत नियोजन केले आणि जनतेने पाण्याची किंमत ओळखली, तर संभाव्य संकटाची तीव्रता कमी करता येईल. मात्र आजही आपण पावसाच्या भरवशावर बसलो, तर उद्या कोरडी शेती, रिकामे जलसाठे, तहानलेली गावे आणि चाऱ्यासाठी भटकणारे पशुधन हे वास्तव ठरू शकते. परतीचा पाऊस पडावा, ही प्रार्थना करूया पण केवळ प्रार्थनेवर भविष्य सोडू नका.! आज पाणी जपा आज नियोजन करा आज निर्णय घ्या.! कारण उद्याचा दुष्काळ हा केवळ निसर्गाचा नाही, तर आजच्या निष्क्रियतेचाही परिणाम असू शकतो.!

# प्रत्येक गावात खेळाचे मैदान, नियोजन मिशन मोडवर करा–पालकमंत्री प्रकाश आबिटकर

**कोल्हापूर। प्रतिनिधी**

**प्रत्येक गावात खेळांसाठी मैदान उपलब्ध व्हावे यासाठी प्रशासनाने मिशन मोडवर नियोजन करावे, तसेच अद्ययावत विभागीय क्रीडा संकुलाचा प्रस्ताव तातडीने तयार करावा, असे निर्देश पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.**

छत्रपती शिवाजी स्टेडियम येथे झालेल्या जिल्हा क्रीडा संकुल समितीच्या बैठकीस खासदार छत्रपती शाहू महाराज, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष तथा आमदार राजेश क्षीरसागर, आमदार अमल महाडिक, चंद्रदीप नरके, जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भारुड, निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव व अतिरिक्त आयुक्त रविकांत अडसूळ उपस्थित होते. क्रीडा संकुलांच्या बळकटीकरणासाठी सीएसआर निधीचा वापर करण्याचे नियोजन करावे, असे सांगतानाच निकृष्ट क्रीडा साहित्य खरेदी करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देशही आबिटकर यांनी दिले. यासाठी दोन खेळाडूंसह तीन तज्ज्ञांची समिती नियुक्त करण्यात येणार आहे. बैठकीत जलतरण तलाव, मैदान वापर नियमावली, भाडेदर, पार्किंग सुविधा व शेंडा पार्क येथील जागा क्रीडा संकुलासाठी उपलब्ध करण्याबाबत चर्चा झाली.



## गणेशोत्सवात मुंबईहून कोल्हापूरसाठी कोकणच्या धर्तीवर बससेवा

### चाकरमान्यांची आर्थिक लूट होऊ देणार नाही–प्रकाश आबिटकर

**कोल्हापूर : गणेशोत्सवानिमित्त मुंबईहून कोल्हापूर, आजरा, चंदगड व गारगोटी येथे येणाऱ्या चाकरमान्यांसाठी कोकणच्या धर्तीवर विशेष बससेवेचे नियोजन करण्यात आले असून नागरिकांची आर्थिक लूट होऊ नये, यासाठी परिवहन व प्रादेशिक परिवहन विभागाने दक्षता घ्यावी, असे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले.**

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीस खासदार छत्रपती शाहू महाराज, आमदार राजेश क्षीरसागर, अमल महाडिक, चंद्रदीप नरके, जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, पोलीस अधीक्षक निलोत्पल, आयुक्त डॉ. राजेंद्र भारुड, गटनेते शारंगधर देशमुख, मुरलीधर जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव व अतिरिक्त आयुक्त रविकांत अडसूळ उपस्थित होते. मुंबईत रेल्वे अधिकाऱ्यांसोबत अतिरिक्त रेल्वेगाड्यांबाबत बैठक घेण्यात आली असून, परिवहन मंत्र्यांकडे केलेल्या मागणीनुसार ९४ अतिरिक्त बसेस उपलब्ध करण्यात आल्याचे आबिटकर यांनी सांगितले. खासगी बसचालकांकडून चाकरमान्यांना आर्थिक त्रास होणार नाही यासाठी दोन्ही शहरांतील अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

## गणेशोत्सवानिमित्त कोकणात जाणाऱ्या भाविकांना टोलमाफी

कोल्हापूर : गणेशोत्सवानिमित्त ११ ते २७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना महाराष्ट्र शासनाने टोलमाफी जाहीर केली आहे. परिवहन आयुक्तांच्या आदेशानुसार मुंबई–बेंगळूरू व मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गासह सार्वजनिक बांधकाम विभाग आणि एमएसआरडीसीच्या टोलनाक्यांवर कोकणात जाणाऱ्या खासगी वाहनांना व एसटी बसेसना टोलमधून सूट मिळणार आहे. भाविकांनी वाहनाची कागदपत्रे घेऊन प्रादेशिक परिवहन कार्यालय, कोल्हापूर किंवा सीमा तपासणी नाका, कागल येथे संपर्क साधून विनामूल्य टोल पास घ्यावा, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी संजीव भोर यांनी केले आहे.

## मिरवणुकीतील वाहनांच्या तपासणीसाठी १२ ते १४ सप्टेंबर आरटीओ कार्यालय सुरू

कोल्हापूर : मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या वाहनांची कागदपत्रे व फिटनेस तपासणी करण्यासाठी १२ ते १४ सप्टेंबर या कालावधीत प्रादेशिक परिवहन कार्यालय, कोल्हापूर सुरू राहणार आहे. वाहनधारकांनी या कालावधीत आवश्यक कागदपत्रे व वाहनांची फिटनेस तपासणी करून घ्यावी, अशी माहिती उपप्रादेशिक परिवहन अधिकारी मनोज ओतारी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

# मुंबई शहराच्या विविध छटा' टिपण्याची छायाचित्रप्रेमींना संधी

## एमटीडीसीतर्फे छायाचित्रण स्पर्धा, २२ सप्टेंबरपर्यंत प्रवेशिका पाठविण्याचे आवाहन

**मुंबई प्रतिनिधी**

**मुंबईची वैविध्यपूर्ण जीवनशैली, संस्कृती आणि दैनंदिन अनुभव छायाचित्रातून मांडण्याची संधी छायाचित्रप्रेमींना मिळणार आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (एमटीडीसी), पर्यटन विभाग आणि जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर यांच्या संयुक्त विद्यमाने 'मुंबई पर्यटन' अंतर्गत 'मुंबई शहराच्या विविध छटा' या विषयावर छायाचित्रण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी २२ सप्टेंबर २०२६ पर्यंत प्रवेशिका स्वीकारण्यात येणार आहेत.**

स्पर्धकांनी छायाचित्रासोबत ते स्पर्धेच्या विषयाशी कसे संबंधित आहे, याचे थोडक्यात वर्णन द्यावे. प्रवेशिका सहभागीचे नाव आणि संपर्क तपशीलांसह mumbaitourism.maharashtra.gov.in या ई–मेलवर पाठवाव्यात. प्राप्त प्रवेशिकांची स्पर्धेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्राथमिक छाननी करण्यात येईल. त्यानंतर पात्र छायाचित्रांचे एमटीडीसीने नियुक्त केलेल्या परीक्षकांमार्फत मूल्यमापन केले जाईल. विषयाशी संबंधितता, नावीन्य, रचना, तांत्रिक गुणवत्ता आणि एकूण प्रभाव आदी निकषांचा मूल्यमापनात विचार केला जाईल. छायाचित्रातून मुंबईची कथा, भावना अथवा वेगळा दृष्टिकोन प्रभावीपणे सादर करण्याला विशेष महत्त्व दिले जाईल. एमटीडीसीचे व्यवस्थापकीय संचालक नीलेश आर. गटणे म्हणाले की, मुंबई हे असंख्य कथा आणि अनुभवांनी समृद्ध असे शहर आहे. प्रत्येक अनुभव मुंबईच्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाची वेगळी झलक दाखवतो. या स्पर्धेच्या माध्यमातून छायाचित्रप्रेमींनी आपल्या सर्जनशील नजरेतून हे क्षण टिपावेत आणि मुंबईची विविध रूपे जगासमोर आणावीत, असे आमचे आवाहन आहे. अधिक माहितीसाठी ९४२५७–१७५२९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.

## सचिवांशी गैरवर्तनाच्या निषेधार्थ एमपीएससी अधिकारी–कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन

**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सचिव महेंद्र हरपाळकर यांच्याशी ११ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या गैरवर्तनाच्या निषेधार्थ आयोगातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तीव्र निषेध व्यक्त करत काम बंद आंदोलनाचा निर्णय घेतला आहे. आयोगातील अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेची शासनाकडून ठोस, स्पष्ट आणि प्रभावी हमी मिळेपर्यंत हे आंदोलन सुरू ठेवण्याची भूमिका त्यांनी मांडली आहे.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोग ही संविधानिक संस्था असून सचिव हे आयोगाचे प्रशासकीय प्रमुख आहेत. त्यामुळे प्रशासकीय प्रमुखांशी झालेल्या गैरवर्तनाची घटना ही गंभीर असून, संबंधित व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी अधिकारी–कर्मचाऱ्यांनी केली आहे. तसेच आयोगातील अधिकारी–कर्मचाऱ्यांना धमकीवजा वक्तव्ये करण्यात आल्याने त्यांच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## गणेशोत्सवानिमित्त 'श्रीगणेशा आरोग्याचा' अभियानांतर्गत सांगली जिल्ह्यात आरोग्य शिबीरांचे आयोजन

**सांगली ।प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून मुख्यमंत्री सचिवालयाच्या अधिनस्त मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने गणेशोत्सवानिमित्त १४ ते २५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत राज्यभर श्री गणेशा आरोग्याचा अभियान २०२६ राबविण्यात येणार आहे.**

या अभियानांतर्गत सांगली जिल्ह्यात विविध ठिकाणी आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाच्या वतीने देण्यात आली.

## विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग गणेशोत्सव, ज्येष्ठा गौरी सणानिमित्त दोन दिवस बंद

**लातूर । प्रतिनिधी**

**येत्या सोमवारी, १४ सप्टेंबर, २०२६ रोजी गणेश चतुर्थीनिमित्त सार्वजनिक सुट्टी असल्याने तसेच शुक्रवार, १८ सप्टेंबर, २०२६ रोजी लातूर जिल्ह्यात जेष्ठा गौरी सणानिमित्त स्थानिक सुट्टी असल्याने विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग बंद राहील.**

तसेच सलग सुट्टी जोडून आलेली असल्यामुळे रविवार, १३ सप्टेंबर व गुरुवार, १७ सप्टेंबर, २०२६ रोजी बाह्यरुग्ण विभाग नियमित वेळेत सुरु राहील. बाह्यरुग्ण विभाग दोन दिवस बंद असला, तरी रुग्णालयाची आपत्कालीन सेवा २४ तास अविरत सुरू राहील, असे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन गरुड यांनी कळविले आहे.

## मुंबई उपनगर जिल्ह्यात २९ सप्टेंबर रोजी १८ ठिकाणी रोजगार मेळाव्यांचे आयोजन - जिल्हाधिकारी सौरभ कटियार

मुंबई । प्रतिनिधी

मुंबई उपनगर जिल्ह्यात २९ सप्टेंबर २०२६ रोजी १८ ठिकाणी 'पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार महाकुंभ–महाराष्ट्र' रोजगार मेळावे आयोजित करण्यात येणार आहेत. या रोजगार मेळाव्यांमध्ये जिल्ह्यातील रोजगारइच्छुक युवक–युवती, उद्योजक तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या आस्थापनांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले आहे.

# माफसू'च्या विकासकामांना गती देण्याचे पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचे निर्देश

**मुंबई । प्रतिनिधी**

**पशुवैद्यक विज्ञान व पशुसंवर्धन पदवी (बीव्हीएससी अँड एएच) अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना इतर वैद्यकीय शाखांप्रमाणे १८ हजार रुपये विद्यावेतन करण्याच्या प्रस्तावानुसार ४ कोटी १२ लाख रूपयाची तरतुद करण्याबाबतच्या प्रस्तावाला आगामी मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता घेण्यासाठी कारावी. विद्यापीठाचा शैक्षणिक दर्जा अधिक उंचावून विद्यार्थ्यांना हॉस्टेलसह आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिले.**

मंत्रालयात महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूरच्या (माफसू) शैक्षणिक, प्रशासकीय तसेच पायाभूत सुविधांशी संबंधित विविध महत्त्वाच्या विषयांचा पशू व मत्स्य संवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा घेण्यात आला. यावेळी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूरचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील, अधिष्ठाता डॉ. शिरीष उपाध्ये, कुलसचिव मोना ठाकूर, उपकुलसचिव डॉ.ए.पी.गांवडे, सहसचिव नि.भा.मराळे उपस्थित होते.

## पान १ वरून....

### मुंबईकडे निघणार मराठ्यांचा लोंढा..सरकारने

तो कोणाविरुद्धचा संघर्ष बनता कामा नये. सरकार आणि आंदोलनकर्त्यांनी 'जिंकणे' नव्हे, महाराष्ट्राला जिंकवावे.! या संघर्षात सरकार जिंकले आणि आंदोलन हरले, किंवा आंदोलन जिंकले आणि सरकार हरले, असा प्रश्नच असू नये. खरा विजय तेव्हाच असेल, जेव्हा महाराष्ट्रातील सामाजिक सलोखा अबाधित राहील आणि न्याय्य, कायदेशीर तोडग्याच्या दिशेने ठोस पाऊल पडेल. राजकारणाला या आंदोलनातून आपली पोळी भाजण्याची संधी दिसत असेल पण महाराष्ट्राला आज राजकीय घोषणा नकोत. महाराष्ट्राला हवा आहे तो टिकाऊ आणि न्यायालयातही टिकणारा निर्णय. कारण घाईघाईत घेतलेला, कायदेशीर कसोटीवर न टिकणारा निर्णय पुन्हा समाजाच्या हातात निराशाच देईल. आणि अनेक वर्षांपासून आशेवर उभ्या असलेल्या तरुण पिढीला पुन्हा संघर्षाच्या रस्त्यावर ढकलेल. आता निर्णयाची वेळ, टाळाटाळीची नाही.! मुंबईकडे निघणाऱ्या आंदोलनाच्या पावलांचा आवाज सरकारने ऐकला पाहिजे. तो केवळ एका नेत्याचा किंवा एका समाजाचा आवाज नाही तो आपल्या भवितव्याबाबत उत्तर मागणाऱ्या असंख्य कुटुंबांच्या अपेक्षांचा आवाज आहे. त्याचवेळी आंदोलनकर्त्यांनीही लक्षात ठेवले पाहिजे की, महाराष्ट्राची शांतता, सामाजिक एकोपा आणि सर्वसामान्य नागरिकांचे जीवन हेही तितकेच महत्त्वाचे आहे. सरकारने संवेदनशीलता दाखवावी आंदोलनकर्त्यांनी संयम जपावा आणि महाराष्ट्राने एकमेकांविरोधात उभे राहण्या ऐवजी न्याय्य तोडग्यासाठी एकत्र उभे राहावे.! आज महाराष्ट्राला संघर्षाची आग नको आहे महाराष्ट्राला संवादाचा प्रकाश हवा आहे. कारण मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटणे महत्त्वाचे आहेच पण तो सोडविताना महाराष्ट्राच्या सामाजिक ऐक्याला तडा जाणार नाही, हे जपणे त्याहूनही महत्त्वाचे आहे.!

-----------

### मराठवाड्यात ३ लाख १६ हजारांहून

म्हणाले की, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, लातूर आणि धाराशिव या आठ जिल्ह्यांमध्ये कुणबी प्रमाणपत्राच्या प्रक्रियेला गती देण्यात आली आहे. एकूण ३,१७,५६९ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ३,१६,९७७ प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली आहेत. याशिवाय २,९५,३०५ प्रमाणपत्रे १० टक्के आरक्षणाच्या अनुषंगाने देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. जात पडताळणी प्रक्रियेबाबत माहिती देताना मंत्री डॉ. सामंत यांनी सांगितले की, मराठवाड्यात २१,०५१ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी १६,११० प्रकरणे निकाली काढून प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. या प्रक्रियेत केवळ ६४ प्रकरणे नामंजूर झाली असून, ही संख्या एकूण अर्जांच्या तुलनेत सुमारे ०.३ टक्के आहे. उर्वरित प्रकरणांवरही नियमानुसार कार्यवाही सुरू असून, नागरिकांना आवश्यक त्या प्रमाणपत्रांची पूर्तता करून देण्यासाठी प्रशासनाला निर्देश देण्यात आले आहेत. शासनाने उपलब्ध करून दिलेल्या जुन्या अभिलेखांच्या माध्यमातूनही नागरिकांना मोठ्या प्रमाणात सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आतापर्यंत शोधण्यात आलेल्या ५७ लाख नोंदी जनतेला पाहता याव्यात यासाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. ग्रामपंचायत स्तरापर्यंत ही माहिती पोहोचविण्यासाठी तसेच नागरिकांना आवश्यक माहिती सहज उपलब्ध व्हावी यासाठी १० ते १७ सप्टेंबरदरम्यान विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. न्यायमूर्ती शिंदे समितीचा मराठवाडा दौरा ७ सप्टेंबरपासून सुरू झाला असून, या अनुषंगाने विभागातील प्रशासनाशी समन्वय साधून कार्यवाहीचा आढावा घेण्यात येत आहे. आजच्या बैठकीत उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी तसेच जात पडताळणी समितीचे प्रमुख अधिकारी सहभागी झाले होते. स्थानिक पातळीवरील कार्यवाही अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी वरिष्ठ अधिकारी आणि जिल्हा प्रशासन यांच्यात समन्वय साधण्यात आला. हैदराबाद गॅझेटियरच्या अनुषंगाने प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली असून, यासंदर्भातील अर्जांबाबत महाधिवक्त्यांचे कायदेशीर मत घेण्यात येणार आहे. तसेच सातारा आणि कोल्हापूर गॅझेटियर लागू करण्याबाबत शासनाने सकारात्मक भूमिका घेतली असल्याचे मंत्री डॉ. सामंत यांनी स्पष्ट केले. मराठा समाजाला न्याय देताना संविधानिक व न्यायिक चौकटीत राहून आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी शासन पूर्णपणे सकारात्मक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील शासन मराठा समाजाला कायदेशीर आणि टिकणारे आरक्षण मिळवून देण्यासाठी कटिबद्ध आहे. त्याचवेळी इतर मागासवर्गीय समाजाच्या आरक्षणाला किंवा त्यांच्या हक्कांना कोणताही धक्का लागू नये, याचीही शासनाकडून पूर्ण दक्षता घेतली जात असल्याचे मंत्री डॉ. सामंत यांनी सांगितले. प्रशासकीय यंत्रणेकडून सुरू असलेली कार्यवाही, उपलब्ध करून देण्यात आलेल्या नोंदी, प्रमाणपत्रांचे वाटप आणि जात पडताळणीची प्रकरणे याबाबतची माहिती संबंधित घटकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. शासनाची ही कार्यवाही अधिक गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना सातत्याने करण्यात येत असल्याचेही मंत्री डॉ. सामंत यांनी स्पष्ट केले.

----------------

### बालकांच्या चेहऱ्यावर फुलणार हसू; दुभंगलेले

ओठ व टाळू असलेले राहणार नाही याची काळजी राज्याचा पालक या नात्याने मुख्यमंत्र्यांनी घेतली आहे. या सामंजस्य कराराद्वारे राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत (आरबीएसके) तपासणीमध्ये आढळलेल्या अशा बालकांना जिल्हा नोडल अधिकाऱ्यांच्या औपचारिक संदर्भपत्राद्वारे 'स्माईल ट्रेन इंडिया'च्या मान्यताप्राप्त रुग्णालयांमध्ये उपचारासाठी पाठविण्यात येईल. संबंधित जिल्ह्यांना विशिष्ट भागीदार रुग्णालयांशी जोडण्यासाठी दोन्ही संस्था समन्वयाने काम करणार आहेत. दुभंगलेले ओठ व टाळू यांच्या उपचारांविषयी अधिक माहितीसाठी १८००१०३८३०१ या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. उपचारासाठी रुग्ण पाठविणे, त्यांच्या नोंदी ठेवणे आणि जिल्हा नोडल अधिकाऱ्यांशी समन्वय साधण्यासाठी प्रत्येक मान्यताप्राप्त रुग्णालयाचा प्रकल्प संचालक नोडल अधिकारी म्हणून काम करणार आहे. संबंधित जिल्ह्याचे जिल्हा शल्यचिकित्सक शस्त्रक्रियेपूर्वी रुग्णालयातील शस्त्रक्रियागृहाच्या सुविधा आणि भूलतज्ज्ञांची उपलब्धता यांची खातरजमा करतील.

**राज्यातील या १५ रुग्णालयांमध्ये होणार उपचार..**

या करारांतर्गत राज्यातील १५ मान्यताप्राप्त रुग्णालयांत या व्याधीवर उपचार उपलब्ध होतील : १. आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, वर्धा, २. आनंदऋषीजी हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटर, अहिल्यानगर, ३. आस्था प्लास्टिक सर्जरी हॉस्पिटल, जळगाव, ४. बेंबडे हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर,५. एलिट कॉस्मो क्लिनिक अँड प्लास्टिक सर्जरी हॉस्पिटल, सोलापूर, ६. लहाने हॉस्पिटल, लातूर, ७. मीरा एनएक्स हॉस्पिटल, मुंबई, ८. एमआरआर चिल्ड्रन्स हॉस्पिटल, ठाणे, ९. पूना हॉस्पिटल, पुणे, १०. सहयोग हॉस्पिटल, गोंदिया, ११. श्रीराम हॉस्पिटल, अकोला, १२. शुश्रूषा सिटिझन्स को–ऑपरेटिव्ह हॉस्पिटल, मुंबई, १३. स्वामी विवेकानंद मेडिकल मिशन हॉस्पिटल, नागपूर, १४. वेदांत हॉस्पिटल प्रा. लि., नाशिक, १५. वेस्टर्न इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ न्यूरोसायन्सेस (विन्स), कोल्हापूर., कार्यक्रमाच्या प्रगतीचा नियमित आढावा घेण्यासाठी दोन्ही संस्थांच्या प्रतिनिधींची संयुक्त समिती स्थापन करण्यात येणार आहे. तसेच आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक यांच्यामार्फत या प्रकल्पाचे नियमित त्रयस्थ मूल्यमापन करण्यात येईल.

------------------

### फडणवीस, जॅकी श्रॉफ यांच्यासह

ॲड आशीष जयस्वाल, आमदार सर्वश्री कृष्णा खोपडे, मोहन मते, प्रवीण दटके, डॉ. राजीव पोतदार तसेच महापौर निता ठाकरे, उपमहापौर लीला हाथीबेड, फ्रांसचे वाणिज्यदूत पॅट्रीक लेवेरीनो, नॉर्वेच्या वाणिज्य दूत मोनिका निगलगार्ड, फिनलँडच्या वाणिज्यदूत पेट्रा थीमन आदि मान्यवर यावेळी उपस्थिती होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह इतर मान्यवरांच्या वतीने मिरवणुकीवर पुष्पवर्षाव करण्यात आला.

-----------------

### 'डीसीएस एमएच' मोबाईल पवरून शेतकऱ्यांनी

पमध्ये आपला शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) प्रविष्ट करून शेतातील पिकांची नोंदणी करता येणार आहे. शेतकरी ओळख क्रमांकाशी संलग्न असलेल्या सर्व शेतजमिनीवरील पिकांची नोंदणी या पच्या माध्यमातून सहज करता येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

-------------

# बीड जिल्ह्यात अवैध गौण खनिज उत्खननाविरोधात धडक मोहीम

## ६५ स्टोन क्रशर-खाणी सील, गेवराईत अवैध वाळू वाहतूकदारांवर कारवाई, यंत्रसामग्री व वाहने जप्त

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यात अवैध स्टोन क्रशर, दगडखाणी तसेच गौण खनिजाच्या अनधिकृत उत्खनन आणि वाहतुकीविरोधात जिल्हा प्रशासनाने विशेष मोहीम तीव्र केली असून, १ ते ११ सप्टेंबर २०२६ या कालावधीत जिल्हाभरात धडक कारवाया करण्यात आल्या आहेत. या मोहिमेत आतापर्यंत ६५ अवैध स्टोन क्रशर व दगडखाणी सील करण्यात आल्या असून, अवैध उत्खनन व वाहतुकीच्या प्रकरणांमध्ये वाहने आणि यंत्रसामग्रीही जप्त करण्यात आली आहे.**

मा. जिल्हाधिकारी यांच्या स्पष्ट निर्देशानुसार बीड जिल्ह्यात अनधिकृत खनिज उत्खनन आणि वाहतुकीविरोधात अत्यंत कडक व विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये महसूल व पोलिस प्रशासनाच्या संयुक्त पथकांकडून कारवाया सुरू आहेत.

**बीड जिल्हा प्रशासनाचा कडक इशारा**

**गेवराईत संयुक्त पथकाची धडक कारवाई**

दि. ११ सप्टेंबर २०२६ रोजी गेवराई तालुक्यातील मौजे म्हाळसपिंपळगाव व मौजे राक्षसभुवन येथे अवैध वाळू उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांविरोधात कारवाई करण्यात आली. उपविभागीय अधिकारी गेवराई यांच्या मार्गदर्शनाखाली तहसील प्रशासन, महसूल अधिकारी तसेच परिविक्षाधीन पोलिस उपअधीक्षक भारत पांडे यांच्या नेतृत्वाखालील पोलिस पथकाने संयुक्त कारवाई केली. या कारवाईदरम्यान अवैध वाळू उत्खनन व वाहतूक करताना आढळून आलेली वाहने, यंत्रसामग्री व इतर साहित्य जप्त करण्यात आले. तसेच अवैध उत्खननासाठी वापरण्यात आलेल्या जागेच्या खुणाही नष्ट करण्यात आल्या आहेत.

**तालुकानिहाय कारवाईचा धडाका**

जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये करण्यात आलेल्या कारवाईत मोठ्या प्रमाणावर अनधिकृत स्टोन क्रशर व दगडखाणींवर कारवाई करण्यात आली. बीड, गेवराई, शिरूर, पाटोदा, आष्टी, माजलगाव, वडवणी, धारूर, अंबाजोगाई, केज व परळी वैजनाथ या तालुक्यांमध्ये ही मोहीम राबविण्यात आली. एकूण कारवाईत ६५ स्टोन क्रशर-दगडखाणी सील करण्यात आल्या असून, ६ अवैध उत्खनन व वाहतूक प्रकरणांवर कारवाई करण्यात आली आहे. तसेच १४ ट्रॅक्टर, १ लोडर/जेसीबी आणि ७ अन्य प्रकारची यंत्रसामग्री अथवा वाहने जप्त करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.

**थेट एफआयआर दाखल करण्याचा इशारा**

अवैध उत्खनन, वाहतूक व तस्करी करणाऱ्यांविरोधात शासनाच्या परिपत्रकानुसार केवळ दंडात्मक कारवाई न करता थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, पर्यावरण संरक्षण अधिनियम, खाण व खनिजविषयक कायदे तसेच सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक कायद्यांतर्गत कठोर कारवाई केली जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**सराईतांवर 'एमपीडीए'ची कारवाई**

वारंवार अवैध उत्खनन किंवा वाळू-गौण खनिज तस्करी करणाऱ्या सराईत व्यक्तींवर महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड व इतर धोकादायक व्यक्तींच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबतच्या कायद्यातील (एमपीडीए) तरतुदीनुसार प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेची कारवाई करण्याचाही इशारा देण्यात आला आहे. खनिजाच्या मूळ स्वामित्व शुल्काच्या दहा पटीपर्यंत दंडात्मक वसुली करण्याची तरतूद असून, जिल्ह्यातील सर्व अनधिकृत क्रशर, अवैध खाणी, उत्खनन व वाहतुकीविरोधातील मोहीम आणखी तीव्र करण्यात येणार आहे.

**नागरिकांना प्रशासनाचे आवाहन**

बीड जिल्ह्यात कुठेही अवैध रेती, मुरूम किंवा माती उत्खनन व वाहतूक होत असल्याचे अथवा विनापरवाना खदान किंवा क्रशर सुरू असल्याची माहिती नागरिकांना मिळाल्यास त्यांनी तातडीने जिल्हाधिकारी कार्यालय, संबंधित उपविभागीय अधिकारी किंवा तहसीलदार कार्यालयाला माहिती द्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# कुणबी जात प्रमाणपत्र विशेष शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद, दोन दिवसांत १४२ अर्ज दाखल



**लातूर प्रतिनिधी**

**लातूर जिल्ह्यात पात्र नागरिकांना कुणबी जात प्रमाणपत्र मिळणे सुलभ व जलद व्हावे यासाठी १० ते १७ सप्टेंबर २०२६ दरम्यान विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक महसूल मंडळ स्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.**

पहिल्या दोन दिवसांत २१ शिबिरांमध्ये १४२ अर्ज प्राप्त झाले असून नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याची माहिती जिल्हास्तरीय नोडल अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ यांनी दिली. लातूर तालुक्यात ६ शिबिरांत ११८ अर्ज, रेणापूरमध्ये २ शिबिरांत १४, निलंग्यात ४ शिबिरांत ५, तर जळकोटमध्ये एका शिबिरात ५ अर्ज प्राप्त झाले आहेत. विशेष म्हणजे एकही अर्ज नाकारण्यात आलेला नाही. शिबिरांमध्ये जुन्या कुणबी नोंदी शोधणे, पुराव्यांची पडताळणी, नवीन अर्ज स्वीकारणे व आवश्यक कागदपत्रांसाठी नागरिकांना मार्गदर्शन करण्यात येत आहे. पात्र नागरिकांनी १७ सप्टेंबरपर्यंत सुरू असलेल्या या विशेष मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ यांनी केले आहे.

# 'श्रीगणेशा आरोग्याचा'तून २० लाख नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी

## राज्यात २० हजार आरोग्य शिबिरे ; सर्व ३६ जिल्ह्यांत उपक्रम

**मुंबई । प्रतिनिधी**

**श्रीगणेशोत्सवात भक्तांच्या आरोग्याची काळजी घेत मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकाराने राज्यभर सुमारे २० हजार मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. सार्वजनिक गणेश मंडळांच्या मंडपांपासून महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत तसेच ग्रामीण भागापर्यंत ही सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रमाचे हे दुसरे वर्ष आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकाराने सार्वजनिक आरोग्य विभाग सुमारे १० हजार सार्वजनिक गणेश मंडळे, शासकीय व निमशासकीय यंत्रणा, सामाजिक संस्था आणि दात्यांच्या सहभागातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यंदा राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांत उपक्रमाची व्याप्ती वाढविण्यात आली असून नागरिकांना त्यांच्या परिसरातच मोफत आरोग्य तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**डॉक्टर आपल्या दारी...**

या उपक्रमात नागरिकांना त्यांच्या परिसरात आरोग्य तपासणीची सुविधा मिळावी आणि आजारांचे वेळेत निदान व्हावे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. तपासणीदरम्यान आरोग्यविषयक समस्या आढळल्यास संबंधितांना पुढील तपासणी व उपचारासाठी संदर्भित करण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा रुग्णालये, शहरी आरोग्य आयुक्तालय, स्थानिक स्वराज्य संस्थांची आरोग्य यंत्रणा तसेच धर्मादाय रुग्णालयांतील डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांची मदत घेण्यात येणार आहे. तपासणीनंतर पुढील उपचारांची आवश्यकता असलेल्या पात्र रुग्णांना महात्मा फुले जन आरोग्य योजना तसेच इतर संबंधित शासकीय योजनांच्या माध्यमातून उपचाराचा लाभ मिळवून देण्यात येणार आहे. गेल्यावर्षी दि. २८ ऑगस्ट ते ६ सप्टेंबरदरम्यान आयोजित १२ हजार ६५५ आरोग्य शिबिरांमध्ये ७ लाख ४ हजार ७३ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली होती. त्यापैकी १८ हजार ८०० रुग्णांना पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात आले होते. तसेच २३६ रक्तदान शिबिरांमध्ये १६ हजार ७९८ नागरिकांनी रक्तदान केले होते. या प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर यंदा उपक्रमाची व्याप्ती वाढविण्यात आली आहे.

**या आजारांचा असणार समावेश...**

हृदयरोग, किडनीविकार, कर्करोग, मधुमेह, संसर्गजन्य आजार, मेंदूचे गंभीर आजार, बालरोग यांसह विविध आजारांची प्राथमिक तपासणी करण्यात येणार आहे. गरजेनुसार पुढील तपासणी व उपचारासाठी रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टर तसेच संबंधित रुग्णालयांकडे संदर्भित करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू झालेला 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रम यंदा अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येत आहे. नागरिकांना त्यांच्या परिसरातच मोफत आरोग्य तपासणीची सुविधा मिळणार आहे. आजारांचे वेळेत निदान होऊन गरज असलेल्या रुग्णांना पुढील उपचारासाठी योग्य ठिकाणी संदर्भित करण्यात येणार आहे. यंदा २० लाखांहून अधिक नागरिकांच्या आरोग्य तपासणीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. नागरिकांनी या उपक्रमाचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

**'श्रीगणेशा आरोग्याचा' - २०२६..**

यंदा २० हजार आरोग्य शिबिरे, २० लाखांहून अधिक नागरिकांच्या तपासणीचे उद्दिष्ट, सर्व ३६ जिल्ह्यांत उपक्रमाची अंमलबजावणी, सुमारे १० हजार सार्वजनिक गणेश मंडळांचा सहभाग

# धुळ्यातील उद्योगवाढीला गती, पायाभूत सुविधांसाठी १७ कोटी मंजूर

## उद्योजकांच्या प्रश्नांसाठी दर आठवड्याला 'उद्योग जनता दरबार' - उद्योगमंत्री उदय सामंत

**धुळे । प्रतिनिधी**

**धुळे जिल्ह्यातील उद्योगवाढीला गती देण्यासाठी पाणी, वीज, रस्ते, अग्निशमन आदी पायाभूत सुविधा प्राधान्याने उपलब्ध करून देण्याचे निर्देश उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी दिले. उद्योजकांच्या अडचणी तातडीने सोडवून प्रलंबित विकासकामे निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्याचेही त्यांनी स्पष्ट केले.**



**उद्योजकांच्या अडचणी सोडविण्यात हलगर्जीपणा खपवून घेणार नाही- पालकमंत्री जयकुमार रावल**

उद्योजकांनी मांडलेल्या प्रत्येक प्रश्नावर विभागनिहाय जबाबदारी निश्चित करून कालबद्ध कार्यवाही करावी. उद्योगांच्या न्याय्य अडचणी सोडविताना हलगर्जीपणा किंवा वेळकाढूपणा करणाऱ्यांची गंभीर दखल घेतली जाईल, असा इशारा पालकमंत्री जयकुमार रावल यांनी दिला. जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली 'उद्योग मित्र' व 'औद्योगिक सुरक्षा मित्र' बैठका नियमित घेऊन प्रलंबित प्रश्न प्रत्यक्ष निकाली काढावेत, असेही रावल यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व खादी-ग्रामोद्योग मंडळाच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. यावेळी पालकमंत्री जयकुमार रावल, खासदार शोभा बच्छाव, आमदार मंजुळा गावित, अनुप अग्रवाल, राघवेंद्र भदाणे, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्र सिंह कुशवाह, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व उद्योजक उपस्थित होते. अवधान येथील अग्निशमन केंद्र महिनाभरात सुरू करण्याचे, हरमाळ पाणीपुरवठा योजना ऑक्टोबरअखेर कार्यान्वित करण्याचे आणि नरडाणा एमआयडीसीची प्रशासकीय इमारत १५ दिवसांत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. नरडाणा येथील अखंडित वीजपुरवठ्यासाठी सबस्टेशनचा प्रश्नही तातडीने मार्गी लावण्यास सांगण्यात आले. रावर येथील जमीन नवीन औद्योगिक वसाहतीसाठी उपलब्ध करण्याची प्रक्रिया गतिमान करण्याबरोबरच साक्री मतदारसंघातील तापी काठावरील ६५ एकर जागेवर एमआयडीसी विकसित करण्याचे निर्देश देण्यात आले. उद्योजकांच्या समस्या सोडविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी दर आठवड्याला दुपारी ३ ते ५ या वेळेत 'उद्योग जनता दरबार' आयोजित करावा, असे सामंत यांनी सांगितले. धुळे औद्योगिक क्षेत्रासाठी ७ कोटी आणि नरडाणा एमआयडीसीतील रस्त्यांसाठी १० कोटी, असा एकूण १७ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. दुहेरी करप्रणालीचा प्रश्न, पर्यायी रस्ता, बायपास अथवा पुलाच्या प्रश्नावरही तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

# लातूर जिल्ह्यात ३० सप्टेंबर रोजी महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालतचे आयोजन

## प्रलंबित अर्धन्यायिक महसुली प्रकरणांचा तडजोडीने होणार निपटारा

**लातूर । प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार महसूल प्रशासनातील मंडळ अधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, उपजिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी तसेच जिल्हाधिकारी यांच्या अर्धन्यायिक न्यायालयांमध्ये जमिनींशी संबंधित व इतर प्रलंबित असलेले विविध महसुली दावे व अपीले सामंजस्याने व कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी लातूर जिल्ह्यात येत्या ३० सप्टेंबर २०२६ रोजी महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. या अनुषंगाने लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या मार्गदर्शनानुसार अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा वकील मंडळाच्या पदाधिकाऱ्यांसोबत पूर्वतयारी बैठकीचे आयोजन करण्यात आले.

या बैठकीस उपजिल्हाधिकारी (भूसंपादन समन्वय) श्रीमती संगिता टकले, विधी अधिकारी ॲड. वर्षा खोडसे यांच्यासह जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष ड. शिवकुमार जाधव, उपाध्यक्ष ॲड. लहु चामे, सचिव ॲड. गुरुप्रसाद येरटे व सहसचिव ड. सिद्धेश्वर धायगुडे उपस्थित होते.

या अभियानात जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी व पक्षकारांनी आणि विधिज्ञांनी सहभागी होऊन आपले दीर्घकाळ प्रलंबित महसुली वाद तडजोडीने संपवावेत, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी श्रीमती करमरकर यांनी यावेळी केली. क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून तसेच त्यांच्या सामाजिक न्याय व शेतकरी कल्याणाच्या मूळ विचारांना स्मरून हे अभियान राज्यभरात राबविण्यात येत आहे. महसुली दाव्यांमध्ये एका स्तरावर निकाल लागल्यानंतर निकाल विरोधात लागलेले पक्षकार वरिष्ठ न्यायालयात अपील किंवा पुनरीक्षण अर्ज दाखल करतात, ज्यामुळे हे दावे वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात. विधी सेवा प्राधिकरणाच्या लोक अदालतीच्या धर्तीवर महसुली न्यायालयात प्रलंबित दावे दोन्ही पक्षकारांच्या सहमतीने व कायदेशीर तडजोडीने निकाली काढल्यास अर्धन्यायिक यंत्रणेवरील ताण कमी होऊन नागरिकांची मोठी बचत होणार आहे. या अभियानांतर्गत दर तीन महिन्यांतून एकदा मंडळ अधिकारी ते जिल्हाधिकारी अशा सर्व स्तरांवर लोक अदालतीचे नियमित आयोजन केले जाणार आहे. लातूर जिल्ह्यातील सर्व तालुका, उपविभाग व जिल्हा स्तरावर बुधवार, दिनांक ३० सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ४ या वेळेत महसूल लोक अदालतीचे आयोजन केले जाईल. त्यापूर्वी पक्षकारांना योग्य ते मार्गदर्शन व कायदेशीर सल्ला मिळावा यासाठी सोमवार, २१ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ४ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालय व सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालयांच्या ठिकाणी विधी सल्लागारांच्या सहकार्याने विशेष समुपदेशन केंद्र कार्यान्वित केले जाणार आहे. ज्या अर्धन्यायिक न्यायालयात दावा प्रलंबित असेल तेथे दोन्ही पक्षकारांनी संयुक्त स्वाक्षरीसह आणि आपल्या वकिलांमार्फत विहित 'प्रपत्र-अ' मधील नमुन्यात किमान पाच दिवस आधी तडजोड अर्ज व कायदेशीर तडजोडनामा सादर करणे आवश्यक राहील. जर एखादा पक्षकार आपले अपील परत घेणार असेल तर तसा अर्ज दाखल करावा लागेल. प्राप्त अर्जांची प्राथमिक छाननी करून दोन्ही पक्षांच्या संमतीची खात्री झाल्यानंतर महसूल लोक अदालतीच्या दिवशी दोन्ही पक्षांच्या उपस्थितीत अंतिम आदेश पारित करून प्रकरण कायमस्वरूपी निकाली काढले जाईल, असे लातूर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सांगण्यात आले आहे.

# गणेशोत्सवात कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांची नियुक्ती

**सांगली । प्रतिनिधी**

**सांगली जिल्ह्यात दि. १४ ते २५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. या सणादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्ह्यातील पोलीस ठाण्यामध्ये विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यासंदर्भातील आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी दिले आहेत.**

या आदेशानुसार एकूण २५ अधिकाऱ्यांची जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्याकरीता विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणून दि. १४ ते २५ सप्टेंबर २०२६ या कालावधीसाठी नेमणूक केली आहे. नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांना कायदा व सुव्यवस्था परिस्थिती हाताळावयाची असून त्यांनी या कालावधीत नेमलेल्या पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी यांच्या संपर्कात राहून कार्यवाही करावयाची असल्याचे आदेशात म्हटले आहे.

**'विश्वबंधुत्व पंधरवडा' साजरा करण्याबाबत अमृत संस्थेतर्फे आवाहन**

सांगली : स्वामी विवेकानंदांनी ११ सप्टेंबर १८९३ रोजी अमेरिकेतील शिकागो येथे जागतिक धर्म संसदेत केलेल्या ऐतिहासिक भाषणातून जगाला दिलेला सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता, मानवता, परस्पर सन्मान आणि विश्वबंधुत्वाचा संदेश समाजाच्या विविध घटकांपर्यंत व्यापक स्वरूपात पोहोचविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्या वतीने सन २०२६ पासून ११ ते २६ सप्टेंबर दरम्यान 'विश्वबंधुत्व पंधरवडा' साजरा करण्यात येणार असल्याचे अमृत संस्थेचे जिल्हा व्यवस्थापक यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे. या अभियानात शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, सामाजिक व स्वयंसेवी संस्था, शासकीय व निमशासकीय कार्यालये तसेच विविध खाजगी आस्थापनांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन अमृत संस्थेने केले आहे. प्रत्येक संस्थेने आपल्या कार्यक्षेत्रानुसार उपक्रम आयोजित करून त्यामध्ये विद्यार्थी, युवक आणि नागरिकांचा जास्तीत जास्त सहभाग वाढवावा, अशी अपेक्षा आहे. ऑनलाइन नोंदणीचे आवाहन 'विश्वबंधुत्व पंधरवडा' अभियानात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या संस्थांनी ऑनलाइन नोंदणी करणे आवश्यक असून, त्यासाठी https://vbd.mahaamrut.org.in/ या पोर्टलवर नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नोंदणी केलेल्या संस्थांनी त्यानंतर आपल्या स्तरावर 'शिकागो भाषण कृती कार्यक्रम' अंतर्गत विविध उपक्रम आयोजित करावेत.

**सांगली जिल्ह्यात सर्व मतदान केंद्रावर विशेष नोंदणी शिबिरांचे आयोजन -उप जिल्हा निवडणूक अधिकारी नीता सावंत-शिंदे**

सांगली : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण (डखठ) कार्यक्रमांतर्गत सांगली जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांमध्ये सर्व मतदान केंद्रावर दि. १९, २०, २६ व २७ सप्टेंबर २०२६ या दिवशी विशेष नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती उप जिल्हा निवडणूक अधिकारी नीता सावंत-शिंदे यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे दिली आहे. प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे की, ३१ ऑगस्ट २०२६ ते ३० सप्टेंबर २०२६ हा कालावधी दावे व हरकती सादर करण्यासाठी निश्चित करण्यात आला आहे. या कालावधीत नागरिक नवीन मतदार नोंदणी, मतदार यादीतील नोंदीची दुरुस्ती आणि नावे वगळण्यासाठी अर्ज करू शकणार आहेत. जिल्ह्यातील सर्व विधानसभाम मतदारसंघामध्ये सर्व मतदान केंद्रांवर १९, २०, २६ आणि २७ सप्टेंबर २०२६ या दिवशी सकाळी १०:०० ते सायंकाळी ०६:०० या वेळेत विशेष नोंदणी शिबारे आयोजित करण्यात आली आहेत. कोणताही पात्र मतदार यादीत नाव नोंदवण्यापासून वंचित राहू नये, यासाठी नागरिकांनी आणि युवा मतदारांनी या विशेष शिबिरांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**लघु पाटबंधारे तलाव सनमडीवरील उपसाबंदी चार दिवसांसाठी शिथिल**

सांगली : सनमडी येथील लघु पाटबंधारे तलावावरून होणाऱ्या पाणी उपशावर घालण्यात आलेली बंदी चार दिवसांसाठी शिथिल करण्यात आली आहे. दिनांक ११ ते १४ सप्टेंबर २०२६ या ४ दिवसांच्या कालावधीसाठी सनमडी तलावावरील उपसाबंदी उठवण्यात आली असल्याचे सांगली पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सीमा मोहिते यांनी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# भरती परीक्षा सुधारणांसाठी टास्क फोर्सचा २१ सप्टेंबरला छत्रपती संभाजीनगरमध्ये संवाद

## विद्यार्थी, उमेदवार व संबंधित घटकांशी साधणार थेट संवाद; जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष कक्ष

**लातूर । प्रतिनिधी**

**राज्यातील भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह व उमेदवाराभिमुख करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ४ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये उच्चस्तरीय टास्क फोर्स गठीत केला आहे. राज्यातील भरती परीक्षा पद्धतीचा सर्वंकष अभ्यास करून आवश्यक सुधारणा सुचविण्यासाठी टास्क फोर्स राज्यातील सर्व सहा विभागांना प्रत्यक्ष भेट देणार आहे. त्यानुसार छत्रपती संभाजीनगर येथे २१ सप्टेंबर २०२६ रोजी टास्क फोर्सचा संवाद दौरा होणार आहे.**

या भेटीदरम्यान विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा उमेदवार, पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था तसेच अन्य संबंधित हितधारकांशी थेट संवाद साधून त्यांच्या सूचना, अडचणी व अभिप्राय जाणून घेतले जाणार आहेत. छत्रपती संभाजीनगर विभागासाठी २१ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता स्मार्ट सिटी कार्यालय, आमखास मैदानाजवळ, छत्रपती संभाजीनगर येथे समिती संवाद साधणार आहे. तसेच ज्या नागरिकांना प्रत्यक्ष उपस्थित राहणे शक्य नसेल, त्यांनी आपले लेखी अभिप्राय csn-examreformtaskforcemaharashtra.gov.in या ई-मेलवर पाठवू शकतात. या विभागनिहाय संवादातून प्राप्त होणाऱ्या सूचना व अभिप्रायांचा टास्क फोर्सकडून अभ्यास करण्यात येणार आहे. त्याआधारे भरती परीक्षांमधील गैरप्रकारांना प्रतिबंध, परीक्षा सुरक्षेचे बळकटीकरण, प्रक्रियेतील पारदर्शकता व विश्वासार्हता वाढविणे तसेच परीक्षा व्यवस्था अधिक उमेदवाराभिमुख करण्यासाठी आवश्यक सुधारणांबाबत शासनास शिफारशी सादर करण्यात येतील. सूचना आणि अभिप्राय संकलित करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष कक्ष राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह आणि उमेदवाराभिमुख करण्यासाठी तसेच गैरप्रकारांना प्रतिबंध घालण्यासाठी अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठीत केली आहे. छत्रपती संभाजीनगर येथे २१ सप्टेंबर २०२६ रोजी कामाच्या अनुषंगाने ही समिती भेट देणार आहे. या पार्श्वभूमीवर मराठवाड्यातील जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये विशेष कक्ष स्थापन करण्यात आला असून, हा कक्ष १८ सप्टेंबर २०२६ पर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत कामकाजासाठी खुला राहील. नागरिक आपल्या सूचना व अभिप्राय संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयातील विशेष कक्षात प्रत्यक्ष सादर करू शकतात

SHIV VANI
शिव वाणी
क्रीडा, न्यायनिवाडा, क्राईम घडामोडी...
सोमवार, दि. १४ सप्टेंबर २०२६
Monday, Dt. 14 September-2026

# मराठा समाजासाठी दिलासादायक पाऊल!

## कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जात प्रमाणपत्रासाठी बीड जिल्ह्यात विशेष शिबिरे

## १० ते १७ सप्टेंबरदरम्यान मंडळस्तरावर शिबिरे २ लाख १० हजार ९३१ प्रमाणपत्रांचे वितरण

बीड । प्रतिनिधी

**मराठा समाजातील नागरिकांना कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र विनाविलंब आणि सुलभतेने मिळावे, यासाठी बीड जिल्हा प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. जिल्ह्यात दि. १० ते १७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत सर्व महसूल मंडळस्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून, नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.**

मराठा समाजातील नागरिकांना कुणबी मराठा जात प्रमाणपत्र विना विलंब सुलभतेने मिळावे या उद्देशाने बीड जिल्हा प्रशासनाच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या विशेष मोहिमेची माहिती जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात ११ सप्टेंबर रोजी सकाळी ११:३० वाजता पत्रकार परिषद घेऊन विस्तृतपणे दिली. यावेळी निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्यासह या प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी नियुक्त नोडल अधिकारी मनोज घोडे पाटील उपजिल्हा निवडणूक अधिकारी, बीडचे माहिती अधिकारी यासेरोद्दीन काझी यांची उपस्थिती होती. पत्रकार परिषदेमध्ये अधिक माहिती सांगताना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले की, मराठा समाजातील नागरिकांना जात प्रमाणपत्र मिळविण्यासाठी होणारी धावपळ कमी व्हावी आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता सुलभ व्हावी, हा या विशेष मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे. शिबिरांमध्ये प्राप्त अर्जांची तातडीने छाननी करून पात्र नागरिकांना प्रमाणपत्र वितरणासाठी विशेष भर दिला जाणार आहे. संपूर्ण मोहिमेवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने १६ अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. नागरिकांच्या अडचणींचे तात्काळ निराकरण व्हावे तसेच कामकाजात पारदर्शकता आणि गती राहावी यासाठी श्री. मनोज घोडे पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ते उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व जात पडताळणी समितीशी समन्वय साधणार आहेत.




### महाराष्ट्रात कुणबी मराठा जात प्रमाणपत्र सर्वाधिक देणारा बीड जिल्हा ठरला अव्वल.!

मराठा कुणबी जात प्रमाणपत्रासाठी बीड जिल्ह्यामध्ये २ लाख १० हजार ९४१ अर्ज दाखल झाले होते यापैकी केवळ दहा प्रमाणपत्र कागदपत्राच्या तपासणीमध्ये पेंडिंग असून उर्वरित २ लाख १० हजार ९३१ प्रमाणपत्राचे वाटप झाले आहे. महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक जात प्रमाणपत्र देण्यामध्ये बीड जिल्हा अव्वल ठरला आहे. याबद्दल बीड जिल्ह्यातील सर्व प्रशासकीय अधिकारी आणि यंत्रणेमध्ये काम करणाऱ्या सर्व मंडळ अधिकारी, तहसीलदार, कर्मचारी या सर्वांचे मोठे योगदान असल्यामुळे या सर्व प्रशासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांचे मी जिल्हाधिकारी म्हणून जाहीररीत्या अभिनंदन करतो असे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पत्रकार परिषदेत आवर्जून उल्लेख केला.तसेच बीड जिल्ह्याने प्रमाणपत्र वाटपात महाराष्ट्रात आपली मान उंचावल्याचे जाहीर केले ही बाब निश्चितच कौतुकास पात्र आहे.

### वारसांना अर्थसहाय्य आणि नोकरी देखील..

मराठा आरक्षण आंदोलनामध्ये आजपर्यंत मृत्युमुखी पडलेल्या ८१ पैकी ८० वारसांना प्रतिव्यक्ती १० लाख रुपये प्रमाणे अर्थसहाय्य प्रशासनाने शासनाच्या वतीने वाटप केले आहे. अर्ज दाखल केलेल्या वारसांपैकी ६ व्यक्तींच्या वारसांना एसटी महामंडळामध्ये नोकरी देण्यात आली असून आज ११ सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजी नगर येथील शिबिरामध्ये बीड जिल्ह्यातील २३ वारसांना एसटी महामंडळामध्ये नोकरी देण्यात आली आहे. उर्वरित वारसांना देखील एमआयडीसी व एसटी महामंडळामध्ये शासकीय नोकरी देण्याची कार्यवाही युद्ध पातळीवर सुरू आहे.

### दोन लाखांवर अर्जांना मंजुरी..

जात प्रमाणपत्र वितरणासाठी बीड जिल्हा प्रशासनाने यापूर्वीही मोठ्या प्रमाणावर कार्यवाही केली आहे. उपलब्ध माहितीनुसार, जिल्ह्यात २ लाख १० हजारांहून अधिक अर्ज प्राप्त झाले असून, त्यापैकी २ लाखांहून अधिक अर्ज मंजूर करण्यात आल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

### हैदराबाद गॅझेटनुसारही जलद कार्यवाही..

हैदराबाद गॅझेटमध्ये नमूद पुराव्यांच्या तपासणीच्या आधारे जात प्रमाणपत्र देण्याची प्रक्रियाही जिल्ह्यात प्राधान्याने सुरू आहे. शासनाच्या निर्णयानुसार प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करून पात्र अर्जदारांना प्रमाणपत्र मंजूर करण्यात येत आहे.

बीड जिल्ह्यातील नागरिकांनी जात प्रमाणपत्रासंदर्भातील आवश्यक कागदपत्रांसह आपल्या संबंधित महसूल मंडळस्तरीय विशेष शिबिरात उपस्थित राहून अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. मराठा समाजाच्या जात प्रमाणपत्राच्या प्रश्नाला गती देण्यासाठी प्रशासनाने उचललेले हे पाऊल नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण ठरणार असून, विशेष शिबिरांमुळे अनेक प्रलंबित प्रश्नांना मार्ग मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# राष्ट्रीय लोकअदालतीत सांगली जिल्ह्यात ३१६१ प्रकरणे निकाली

## १९ कोटी ९२ लाख ९६ हजार ७७४ रुपयांची वसुली

सांगली । प्रतिनिधी

**राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार सांगली जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये दि. १२ सप्टेंबर २०२६ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्ष अदिती उदय कदम यांच्या मार्गदर्शनाखाली ही लोकअदालत घेण्यात आली. या लोकअदालतीमध्ये ३१६१ प्रकरणे निकाली काढण्यात आली. या लोकअदालतमध्ये एकूण १९ कोटी ९२ लाख ९६ हजार ७७४ रुपये रक्कमेची वसूली करण्यात आल्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव गि. ग. कांबळे यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे दिली आहे. लोकअदालतीच्या दिवशी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अदिती उदय कदम यांनी उपस्थित पक्षकारांना जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने मिटवून घेऊन आपला वेळ व पैसा वाचविण्याचे आवाहन केले. यावेळी जिल्हा न्यायाधीश क्र. १ व्ही. डी. निंबाळकर, जिल्हा न्यायाधीश -७ श्रीमती एम. एस. काकडे, कौटुंबिक न्यायालय जज श्रीमती एस. जे. घरत, जिल्हा सरकारी वकील ड. प्रमोद भोकरे, वकील संघटनेचे उपाध्यक्ष श्री. महाजन, पक्षकार व विधिज्ञ उपस्थित होते.**

लोक अदालतमध्ये सांगली जिल्ह्यातील २०८४ दावापूर्व प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली. तसेच सर्व न्यायालयांतील १०७७ प्रलंबित प्रकरणे अशी एकूण ३१६१ प्रकरणे निकाली काढण्यात आली. या लोकअदालतमध्ये एकूण १९ कोटी ९२ लाख ९६ हजार ७७४ रुपये रक्कमेची वसूली करण्यात आली. लोक अदालतमध्ये सांगली मुख्यालय येथे पॅनेलप्रमुख म्हणून जिल्हा न्यायाधीश ६ एस. बी. देसाई व तदर्थ जिल्हा न्यायाधीश क्र. १ एम. एम. शेख, २रे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर ए. ए. वाळूजकर, ३रे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर पी. ए. जगदाळे, ५वे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर एस. बी. माने, ४थे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती. पी. एन. गोसावी, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती. व्ही. ए. आद्य, कौटुंबिक न्यायाधीश श्रीमती. एस. जे. घरात, निवृत्त न्यायाधीश एस. ए. उपाध्ये, सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती. एम. डी. खासनीस, २रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती. आर. एस. पाटील यांनी काम पाहिले. तसेच कन्सिलिएटर म्हणून ॲड. जे. व्ही. नवले, ॲड अनुराधा कुलकर्णी, ॲड. स्वप्ना अरविंद देशपांडे, ॲड. सनी सलीम जमादार, ॲड. उदय सॅमसन आवळे, ॲड राजगुरू भूपाळ संकपाळ, ॲड. प्रविण पांडुरंग गोंधळे, डॉ. पूजा नरवाडकर, ॲड. सिध्दार्थ जयकर काकडे यांनी पॅनेल ॲडव्होकेट काम पाहिले. लोकअदालत यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव गि. ग. कांबळे यांनी संपूर्ण नियोजन केले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अधीक्षक शंकरराव वानखेडे तसेच संतोष खंदारे, नितीन आंबेकर आणि विजय माळी उपस्थित होते. लोकअदालतीमध्ये पक्षकारांचा सहभाग मोठ्या प्रमाणात होता. पुढील राष्ट्रीय लोकअदालत १२ डिसेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार असून, पक्षकारांनी यामध्ये सहभागी होऊन आपली प्रकरणे तडजोडीने मिटवून घ्यावीत, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सांगलीतर्फे करण्यात आले आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना

## जिल्ह्यातील प्रलंबित तक्रारींचे २ दिवसात निवारण करा-जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

बीड । प्रतिनिधी

**महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या तक्रारींचे तात्काळ निवारण करण्यासाठी प्रशासनाने पावले उचलली आहेत. तरी जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर प्रलंबित असलेल्या सर्व तक्रारींचे पुढील दोन दिवसांत निवारण करण्याचे आदेश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सर्व राष्ट्रीयकृत बँकांना दिले आहेत.**

जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती सभागृहात दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीची बैठक पार पडली. यावेळी जिल्हा उपनिबंधक सतिश तोटावार यांच्यासह जिल्ह्यातील विविध बँकांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी राष्ट्रीयकृत बँकांच्या कामकाजावर नाराजी व्यक्त केली. तसेच बँकांनी कोणत्याही परिस्थितीत आगामी दोन दिवसांत सर्व तक्रारी निकाली काढाव्यात, जेणेकरून पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होईल, असे आदेशही बैठकीत देण्यात आले. या बैठकीत जिल्ह्यातील कर्जमुक्ती योजनेचा सविस्तर आढावा घेण्यात आला आणि प्रलंबित प्रकरणावर चर्चा करण्यात आली. बीड जिल्ह्यातील एकूण २,२७,१२८ थकीत कर्ज असलेल्या शेतकऱ्यांची माहिती योजनेच्या विशेष पोर्टलवर भरण्यात आली आहे. यापैकी ९६,५२३ शेतकऱ्यांची पहिली यादी पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. प्रसिद्ध यादीतील ७९,६८१ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण यशस्वीरित्या पूर्ण झाले आहे. अद्याप १६,८४२ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण झालेले नाही. आधार प्रमाणीकरण प्रलंबित असलेल्या शेतकऱ्यांपैकी ८,३०५ शेतकऱ्यांनी अजूनही त्यांचा फार्मर प्राप्त करून घेतलेला नाही, ज्यामुळे त्यांचे प्रमाणीकरण रखडले आहे. या योजनेचा लाभ घेताना शेतकऱ्यांना येणाऱ्या विविध अडचणींवर ऑनलाइन पोर्टलद्वारे तक्रारी नोंदवण्याची सुविधा देण्यात आली आहे. ७ सप्टेंबर २०२६ पर्यंत प्राप्त झालेल्या आकडेवारीनुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि राष्ट्रीयकृत बँकांच्या संदर्भात जिल्हास्तरावर एकूण २६७ तक्रारी आणि तालुकास्तरावर ४७ तक्रारी प्रलंबित आहेत. अशी माहिती यावेळी देण्यात आली. प्रशासनाने इतर शेतकऱ्यांनाही त्यांचे फार्मर आयडी प्राप्त करण्याचे तसेच आपले आधार प्रमाणीकरण तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे.

# गणेशोत्सवानिमित्त 'श्रीगणेशा आरोग्याचा' अभियान -जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड



कोल्हापूर । प्रतिनिधी

**गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुदृढ आरोग्यासाठी राज्यभरात 'श्रीगणेशा आरोग्याचा' अभियान राबवण्यात येत आहे. या अभियानांतर्गत जिल्ह्यात १४ ते २५ सप्टेंबर या कालावधीत समुदाय आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी दिले आहेत.**

मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय मुंबई अंतर्गत 'मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष' व 'धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष आणि सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या समन्वयाने ही मोहीम राज्यभरातील सर्व जिल्ह्यांमध्ये राबवली जात आहे. या शिबिरामध्ये उपलब्ध असणाऱ्या प्रमुख सेवा विविध प्रकारच्या आरोग्य तपासण्या, आवश्यक रक्त चाचण्या, ईसीजी तपासणी, इतर अनुषंगिक व उपचारात्मक तपासण्या आणि मोफत औषधोपचार करण्यात येणार आहेत. ही शिबिरे यशस्वी करण्यासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धर्मादाय आयुक्त, नगरपालिका प्रशासन, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी तसेच महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना आणि समन्वयकांना जबाबदारी सोपवण्यात आली आहे. जिल्ह्यातील विविध शासकीय यंत्रणा, सेवाभावी संस्था तसेच शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांच्या सहकार्याने ही शिबिरे पार पडणार आहेत. यासाठी आवश्यक वैद्यकीय अधिकारी, पॅरामेडिकल कर्मचारी, निदानात्मक साधने व औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध करून देण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत.

# चॅरिटेबल ट्रस्टच्या शाळांवर आरटीईची देखरेख-मुख्यमंत्री

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्टद्वारे चालविल्या जाणाऱ्या शाळांमध्ये शिक्षण हक्क कायद्याची (RTE) प्रभावी व पारदर्शक अंमलबजावणी व्हावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने महत्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे.

मुख्यमंत्र्यांच्या या विशेष प्रयत्नांमुळे राज्यातील हजारो शाळांमधील प्रवेश प्रक्रिया, शैक्षणिक सोयी-सुविधा आणि आरटीई अंतर्गत मिळणाऱ्या निधीचा योग्य वापर यावर थेट प्रशासकीय लक्ष राहील. तसेच या यंत्रणेद्वारे शाळांचा नियमित आढावा घेणे शक्य होणार असून, गैरप्रकारांना आळा बसण्यास मोठी मदत होणार आहे.ही प्रणाली लवकरात लवकर कार्यान्वित करण्यासाठी विधि व न्याय विभाग, आवश्यक ते तांत्रिक तज्ज्ञ यांच्यामध्ये योग्य तो विचारविनिमय करून एक सर्वसमावेशक प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हा प्रस्ताव तयार झाल्यानंतर त्याला आवश्यक त्या आर्थिक मंजुऱ्या देऊन तातडीने अंमलबजावणी सुरू केली जाणार आहे.

# राज्यातील भरती परीक्षा पद्धतीचा सर्वंकष आढावा घेण्यासाठी समिती गठित

मुंबई । प्रतिनिधी

**राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत घेण्यात येणाऱ्या भरती परीक्षा अधिक पारदर्शक, शुचितापूर्ण, विश्वासार्ह आणि सुरक्षित पद्धतीने घेण्यासाठी विद्यमान परीक्षा पद्धतीचा सर्वंकष अभ्यास करून आवश्यक सुधारणा सुचविण्यासाठी शासनाने उच्चस्तरीय समिती गठित केली आहे.**

राज्यात विविध विभागांच्या भरती प्रक्रियेत मोठ्या संख्येने उमेदवार सहभागी होत असतात. या परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता राखणे, गैरप्रकारांना आळा घालणे, प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून परीक्षा घेणे व निकाल जाहीर करण्यापर्यंतची प्रक्रिया अधिक सुरक्षित करणे, तसेच उमेदवारांचा परीक्षेवरील विश्वास कायम ठेवणे, या उद्देशाने ही समिती काम करणार आहे. समितीच्या कार्यकक्षेत महत्त्वाचे मुद्दे समितीमार्फत राज्यातील सध्याच्या भरती परीक्षा पद्धतीचा अभ्यास करून परीक्षा घेणाऱ्या संस्थांची निवड व त्यांची कार्यपद्धती तपासणे. प्रश्नपत्रिका तयार करणे, छपाई, वाहतूक व सुरक्षिततेची प्रक्रिया अधिक सक्षम करण्याबाबत उपाय सुचविणे. परीक्षा केंद्रांवरील गैरप्रकार, कॉपी व इतर अनुचित प्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना सुचविणे. परीक्षा प्रक्रियेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्याबाबत शिफारशी करणे. परीक्षा केंद्रांची निवड, उमेदवारांची ओळख पडताळणी, सुरक्षा व देखरेख यांचा आढावा घेणे. परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता व गोपनीयता राखण्यासाठी आवश्यक सुधारणा सुचविणे. विविध विभागांच्या भरती परीक्षांसाठी एकसमान व प्रभावी कार्यपद्धती विकसित करण्याबाबत मार्गदर्शन करणे. समितीने या सर्व बाबींचा अभ्यास करून आवश्यक सुधारणा व उपाययोजनांबाबत शासनाला अहवाल सादर करावयाचा आहे. त्यामुळे आगामी काळात राज्यातील विविध शासकीय भरती परीक्षांच्या प्रक्रियेत महत्त्वपूर्ण बदल होण्याची शक्यता आहे. भरती परीक्षांमधील पारदर्शकता, विश्वासार्हता आणि सुरक्षितता वाढविण्याच्या दृष्टीने शासनाचा हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

# परीक्षा प्रक्रियेत स्थैर्य, सुरक्षितता आणि पारदर्शकतेला प्राधान्य

## विद्यार्थ्यांसह शिक्षक, पालक व भागधारकांशी सल्लामसलत, राज्यातून १८ हजारांहून अधिक ई-मेल्स प्राप्त

पुणे । प्रतिनिधी

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगासह विविध स्पर्धा परीक्षांची प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरक्षित, स्थिर आणि उमेदवाराभिमुख करण्यासाठी राज्य शासनाने स्थापन केलेल्या उच्चस्तरीय भरती परीक्षा टास्क फोर्सच्या वतीने पुण्यात विद्यार्थ्यांसह शिक्षक, पालक आणि अन्य भागधारकांशी सल्लामसलत करण्यात आली. परीक्षा वेळापत्रक, प्रश्नपत्रिकेची गुणवत्ता, प्रश्नपत्रिका गळतीला प्रतिबंध, पदसंख्या, उत्तरतालिका, परीक्षा केंद्रे, तक्रार निवारण आणि 'ऑप्टिंग आऊट' याबाबत विविध सूचना मांडण्यात आल्या.**

सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव (सेवा) तथा टास्क फोर्सच्या अध्यक्ष व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली समिती कार्यरत आहे. समितीत पोलीस महासंचालक सदानंद दाते, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी, नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, संघ लोकसेवा आयोगाचे माजी सदस्य एअर मार्शल अजित शंकरराव भोसले (सेवानिवृत्त) आणि आयआयटी मुंबईचे प्राध्यापक श्यामप्रसाद करगड्डे यांचा समावेश आहे. टास्क फोर्सकडे आतापर्यंत राज्यभरातून १८ हजारांहून अधिक ई-मेल्स प्राप्त झाले आहेत. परीक्षांचे वार्षिक वेळापत्रक निश्चित करून त्याचे पालन करावे तसेच कार्यपद्धतीत वारंवार बदल न करता दीर्घकालीन स्थैर्य द्यावे, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली. विविध संवर्गांसाठी किमान पदसंख्या आधीच जाहीर करण्याची सूचनाही करण्यात आली. प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून छपाई, वाहतूक आणि वितरणापर्यंतची प्रक्रिया अधिक सुरक्षित करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा समितीचा मानस आहे. प्रश्न तयार करणाऱ्या व्यक्तीलाही तो कोणत्या परीक्षेसाठी आहे, याची माहिती नसावी, अशा पद्धतीच्या ई-प्रश्नसंचाचा विचार करण्यात येत आहे. 'झिरो लीक' हे परीक्षाप्रक्रियेतील प्रमुख उद्दिष्ट असल्याचे समितीने स्पष्ट केले. प्रश्नपत्रिकेतील त्रुटी आणि उत्तरतालिकेतील चुका टाळण्यासाठी गुणवत्ता नियंत्रणाची प्रक्रिया अधिक काटेकोर करण्याची, तसेच उत्तरपत्रिका तपासणीसाठी समान निकष व परीक्षकांच्या गुणवत्तेची पडताळणी करण्याची सूचना विद्यार्थ्यांनी केली. उमेदवारांच्या तक्रारी व हरकतींसाठी केंद्रीकृत ऑनलाइन पोर्टल असावे, अशी मागणी करण्यात आली. परीक्षा केंद्रांवर स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी आणि योग्य बैठक व्यवस्था यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यावरही भर देण्यात आला. सर्व परीक्षांसाठी एकदाच नोंदणी व शुल्क भरण्याची व्यवस्था करण्याची सूचनाही मांडण्यात आली. एकाच उमेदवाराला अनेक पदांसाठी पात्रता मिळाल्यास पदनिवड आणि 'ऑप्टिंग आऊट' प्रक्रियेबाबत स्पष्ट धोरण असावे, अशी मागणी करण्यात आली. दिव्यांग व क्रीडा प्रवर्गातील प्रमाणपत्रांची योग्य टप्प्यावर पडताळणी करण्याची सूचनाही करण्यात आली. दरम्यान, पुढील एक वर्ष ऑनलाइन परीक्षा न घेता ओएमआर पद्धतीनेच परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे व्ही. राधा यांनी स्पष्ट केले. या कालावधीनंतर ओएमआर पद्धतीने परीक्षा घेण्याबाबत शासन स्तरावर आवश्यक तो निर्णय घेण्यात येईल. तसेच, ओएमआर पद्धतीच्या परीक्षा अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि एकसमान पद्धतीने घेण्यासाठी प्रमाणित नियमावली तयार करण्याचे काम सध्या सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. देशातील विविध लोकसेवा आयोगांच्या कार्यपद्धतींचा अभ्यास करण्यात येत असून, तमिळनाडू, गुजरात आणि संघ लोकसेवा आयोगाच्या कार्यपद्धतींचा तुलनात्मक अभ्यास करून महाराष्ट्रासाठी उपयुक्त सुधारणा करण्याचा प्रयत्न सुरू आहे. विद्यार्थ्यांसह सर्व भागधारकांकडून मिळालेल्या सूचनांचा गांभीर्याने विचार करून परीक्षा प्रक्रिया अधिक विश्वासार्ह व परिणामकारक केली जाईल, असे राधा यांनी सांगितले. एमपीएससीवरील वाढती जबाबदारी लक्षात घेता आयोगाचे मनुष्यबळ, तांत्रिक क्षमता आणि संस्थात्मक रचना बळकट करण्याची गरजही व्यक्त करण्यात आली. अधिक गतिमान, पारदर्शक आणि उत्तरदायी अधिकारी निवड प्रक्रिया निर्माण करणे हे टास्क फोर्सचे उद्दिष्ट आहे, असे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांनी सांगितले. यावेळी विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, अपर जिल्हाधिकारी सतीश राऊत, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम आदी उपस्थित होते.

हे पत्रक, मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स अॅण्ड पब्लिशर्स, मोंढा रोड, बीड जि. बीड- ४३११२२ येथे छापून साप्ताहिक शिववाणी बीड कार्यालय : घर नं. १०२, छत्रपती कॉलनी, क्रांती नगर, तहसीलच्या मागे, बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिध्द केले. (सर्व वाद बीड न्यायकक्षेत).

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT INDRADHANUSHYA PRINTERS & PUBLISHERS, MONDHA ROAD, BEED, DIST.BEED-431122 AND PUBLISHED AT H.No.102, CHATRAPATI COLONY, KRANTI NAGAR, TAHASIL BACKSIDE, BEED-431122 (MAHARASHTRA) (JURIDICTION AT BEED)